MHAU050018692020

**विशेष दिवाणी दावा क्र.२६/२०२०**
**युसुफ अली व इतर विरुध्द लैलाबी व इतर**

**<u>नि.क्र.३१ वरील आदेश</u>**
**<u>(पारीत दि.२०.०१.२०२६)</u>**

वादी क्र.१ ते ७ यांनी सदरचा अर्ज मृतक प्रतिवादी क्र.१ लैलाबी भ्र. मुसाखॉ पठाण यांचे कायदेशीर वारस/प्रतिनिधी यांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी सादर केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ दि.२२.०३.२०२४ रोजी मौजे शिवूर येथे मयत झाली. त्यांना तिचे मृत्यू प्रमाणपत्र दि.१२.०९.२०२५ रोजी मिळाले. त्यानंतर त्यांना वैयक्तिक कामासाठी बाहेरगावी जावे लागले. त्यामुळे त्यांना मुदतीत मृतकाचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेता आले नाही. अर्ज दाखल करण्यास व मृतकाचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास त्यांनी हेतुपूर्वक विलंब केलेला नाही. जर त्यांना मृतकाचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास संधी मिळाली नाही, तर त्यांचे अतोनात नुकसान होईल. उपरोक्त कथनासह वादींनी त्यांचा अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी वादींच्या अर्जावर म्हणणे दाखल करुन, अर्ज केवळ खर्चाच्या अटीवर मंजुर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी अर्जावर त्यांचा खुलासा दाखल करुन, अर्ज मंजुर करण्यास हरकत घेतलेली नाही.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला, तसेच अभिलेखाचे अवलोकन केले.

५. वादी क्र.१ ते ७ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ७ यांचेविरुध्द वडीलोपार्जीत मिळकतींचे वाटप होवून विभक्त हिस्सा मिळण्यासाठी मूळ दावा दाखल केला आहे. दावा वादींच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना, प्रतिवादी क्र.१ स्वर्गवासी झाली. प्रतिवादी क्र.१ दि.२२.०३.२०२४ रोजी स्वर्गवासी झाल्यानंतर, वादींनी तिचे वारस दि.२२.०७.२०२४ पर्यंत अभिलेखावर आणणे गरजेचे होते. असे असताना त्यांना मृतक प्रतिवादींचे कायदेशीर

वारस अभिलेखावर घेण्यास तब्बल एक वर्ष सात महिन्यांचा विलंब झालेला आहे. वादी व मृतक प्रतिवादी यांच्यात अत्यंत जवळचे नातेसंबंध असुन, वादींना मृतकाच्या कायदेशीर वारसांबाबत माहिती असणे स्वाभाविक आहे. त्यांनी मृतकाचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी मृत्यू प्रमाणपत्र विलंबाने मिळाल्याचे तसेच ते त्यांच्या कामानिमीत्त व्यस्त असल्याचे स्पष्टीकरण सादर केले आहे. प्रतिवादींनी वादीच्या अर्जाला ठोस आक्षेप घेतलेला नसला, तरी अर्जातील कारण ठोस, सयुक्तिक व समर्थनिय नाही. वादींच्या दाव्याचे स्वरुप, त्यात मागणी केलेले दिलासे व उभय पक्षकारांचे नातेसंबंध यांचा विचार करता; दावा गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी मृतक प्रतिवादींचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. असे असले, तरी कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबाचा कालावधी दुर्लक्षीतता येणार नाही. प्राप्त परिस्थितीत, विलंबाची भरपाई खर्चाने करणे आवश्यक राहील.

६. उपरोक्त विवेचनाचा विचार करता, वादींचा अर्ज खर्चाची आकारणी करुन मंजुर करणे योग्य व न्यायसंगत ठरेल. सबब पुढील आदेशः

## <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र.३१) मंजूर करण्यात येतो व वादींना मृतक प्रतिवादी क्र.१ हिचे कायदेशीर वारस/प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब, विधि सेवा समिती, वैजापूर यांचेकडे पुढील तारखेपर्यंत रक्कम रु.२,०००/- खर्च जमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. जर वादींनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम जमा केली नाही, तर दावा प्रतिवादी क्र.१ विरुध्द उपशमन होवून पुढे चालेल याची नोंद घ्यावी.

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2026.01.21 11:56:24 +0530

**( ए. बी. शेख )**

दि.२०.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वैजापूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पीडीएफ करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाखे नावः– अनंत वि. चोपडे (लघुलेखक श्रेणी–२).

न्यायालयाचे नावः– दिवाणी न्यायालय, व.स्तर, वैजापूर

आदेश दिनांकः– २०–०१–२०२६

आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांकः– २१–०१–२०२६

आदेश अपलोड केल्याचा दिनांकः– २१–०१–२०२६

.................................................................